जा.क्र. पोआअ/पशा-4/पंचर दुरुस्ती वार्षिक दरकरार/ 2227 /2018 अमरावती दिनांक 03 MAR 2018 /02/2018

विषय :- पोलीस आयुक्त अमरावती शहर आस्थापनेवरील एकुण 236 पोलीस मोटार वाहनांचे पंचर दुरुस्तीची कामे करण्याकरिता वार्षिक दरकरार करण्याकरिता दोन लिफाफा पध्दतीनुसार दरपत्रके सादर करणे बाबत.

उपरोक्त संदर्भ व विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, पोलीस आयुक्त अमरावती शहर आस्थापनेवर 141 चार चाकी वाहने व 95 मोटार सायकल वाहने असे एकुण 236 पोलीस मोटार वाहनांची पंचर दुरुस्तीची कामे करण्याकरिता वार्षिक दरकरार करावयाचा असल्याने दोन लिफाफा पध्दतीनुसार सिलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी ईच्छुक पंचर दुरुस्तीकारांनी त्यांची दोन लिफाफा पध्दतीनुसार सिलबंद दरपत्रके या कार्यालयातील पत्रव्यवहार शाखेत दिनांक/०१/03/2018 ला 12.00 वाजेपर्यंत (शासकीय सुटी वगळून) सादर करावीत.

पहिला लिफाफा हा तांत्रिक लिफाफा म्हणून (विवरणपत्र 01) आणि दुसरा लिफाफा (विवरणपत्र-2) असे दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रके सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा विवरणपत्र-1 मध्ये खालील नमुद केलेले कागदपत्रे आढळुन आल्यानंतरच दरपत्रकाचा दुसरा लिफाफा उघडण्यात येईल याची कृपया निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

विवरणपत्र-01 च्या लिफाफामध्ये खालील नमुद कागदपत्रे असणे आवश्यक आहे.

1. दुकानाचे नोंदणी प्रमाणपत्राची छायांकीत प्रत.
2. पॅन कार्ड / आधार कार्डची छायांकीत प्रत.
3. यापुर्वी राज्य शासन / केंद्र शासनाशी दरकरार केला असल्यास अनुभव प्रमाणपत्राची छायांकीत प्रत.
4. जी.एस.टी. प्रमाणपत्राची छायांकीत प्रत.

विवरणपत्र-2 च्या लिफाफामध्ये खालील नमुद वाहनांचे प्रकार व कामाचे प्रकारानुसार पंचर दुरुस्तीची दरपत्रके असणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार व कामाचे विवरण | दर |
|---|---|---|
| 01 | कार / जिप वाहनाचे टयुबलेस टायर पंचर दुरुस्ती करणे | |
| 02 | कार / जिप वाहनाचे टायर पंचर दुरुस्ती करणे | |
| 03 | लाईट व्हॅन वाहनाचे टायर पंचर दुरुस्ती करणे | |
| 04 | प्रिझन व्हॅन वाहनाचे टायर पंचर दुरुस्ती करणे | |
| 05 | ट्रक / वरुण वाहनाचे टायर पंचर दुरुस्ती करणे | |
| 06 | कार / जिप वाहनाचे टायर खोल फिटींग करणे. | |
| 07 | लाईट व्हॅन वाहनाचे टायर खोल फिटींग करणे. | |
| 08 | प्रिझन व्हॅन वाहनाचे टायर खोल फिटींग करणे. | |
| 09 | ट्रक / वरुण वाहनाचे टायर खोल फिटींग करणे. | |
| 10 | कार / जिप वाहनाचे टयुबलेस व्हॉलसीट दुरुस्ती करणे | |
| 11 | कार / जिप वाहनाचे साधे व्हॉलसीट दुरुस्ती करणे | |
| 12 | लाईट व्हॅन वाहनाचे व्हॉलसीट दुरुस्ती करणे | |
| 13 | प्रिझन व्हॅन वाहनाचे व्हॉलसीट दुरुस्ती करणे | |
| 14 | ट्रक / वरुण वाहनाचे व्हॉलसीट दुरुस्ती करणे | |
| 15 | मोटार सायकल वाहनाचे टयुबलेस टायर पंचर दुरुस्ती करणे | |
| 16 | मोटार सायकल वाहनाचे टायर पंचर दुरुस्ती करणे | |

Scanned by CamScanner

पोलीस मोटार वाहनांची पंचर दुरुस्तीची कामे करण्याकरिता प्राप्त झालेली दरपत्रके उघडण्याबाबतचा दिनांक व वेळ संबंधीतांना दुरध्वनीव्दारे / ई-मेलव्दारे सूचीत करण्यात येईल.

**पोलीस मोटार वाहनांची पंचर दुरुस्तीची कामाचे अटी व शर्ती पुढील प्रमाणे :-**

1. पंचर दुरस्ती कामाचे दर अधिकृत सर्व्हिसिंग सेंटर पेक्षा जास्त नसावे.
2. पोलीस मोटार वाहनांचे पंचर दुरुस्ती कामाला प्रथम प्राधान्य द्यावे लागेल व त्वरीत प्रभावाने पंचर दुरुस्ती कामे करावे लागेल.
3. दुरुस्ती केलेल्या कामात दोष निर्माण झाल्यास त्याचे विनामुल्य निराकरण करुन देणे दुकानदारांना बंधनकारक राहील.
4. दुरुस्ती कामाचे दरामध्ये सर्व कर समाविष्ट करावे लागेल व त्याप्रमाणे दर सुची दयावी लागेल.
5. पंचर दुरुस्ती कामात बेसिक डिस्काउंट देय असल्यास % चा उल्लेख करावा लागेल.
6. निविदा मंजुरी नंतर आदेश पारीत केल्यानंतर रुपये 100/- चे मुद्रांक शुल्कावर करारनामा करुन दयावा लागेल.

सदरचे पत्र हे या कार्यालयाचे cp.amravati@mahapolice.gov.in या संकेतस्थळावर सुध्दा अपलोड करण्यात आलेले आहेत. प्राप्त निविदापैकी निविदा स्विकृत करण्याचा अंतिम अधिकार पोलीस आयुक्त अमरावती शहर यांनी राखुन ठेवलेला आहे याची कृपया नोंद घ्यावी. तरी ईच्छुक निविदाधारकांनी दोन लिफाफा पध्दतीनुसार दरपत्रके या कार्यालयास विहीत मुदतीत सादर करावीत हि विनंती.

( प्रदिप चव्हाण )
पोलीस उपायुक्त (मुख्यालय)
अमरावती शहर

प्रति,

---------------------------------------------

---------------------------------------------

प्रत,

पोउपनि, सायबर सेल,
2/- उपरोक्त पत्र हे या कार्यालयाचे संकेतस्थळावर अपलोड करुन पुर्तता अहवाल सादर करावा.

जावक लिपीक
पोलीस आयुक्त कार्यालय,
अमरावती.

Scanned by CamScanner